महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ९३ वा दिनांक : ०७/०१/२०२५ वार : मंगळवार

## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडेंचे नाव समोर आल्यास त्यांच्यावरही कारवाई होईल- संजय शिरसाट





**बीड :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकणामुळे राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. या प्रकरणावर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनीही आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव समोर आले, तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल, असे स्पष्ट वक्तव्य संजय शिरसाट यांनी केले आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाप्रकरणी धनंजय मुंडे अडचणीत सापडलेत. या हत्याकांडात त्यांचा विश्वासू वाल्मीक कराड याचा हात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे बीडमधील सर्वपक्षीय आमदारांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. काही नेत्यांकडून धनंजय मुंडे यांची पाठराखण केली जात आहे. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांना याबाबत विचारले असता, त्यांनी उपरोक्त वक्तव्य केले.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव समोर आले, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. या घटनेच्या मागे, पुढे, पडद्यामागे आणखी कुठे जो कोणी असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच सांगितले आहे. त्याप्रमाणे कारवाई सुरु झाली आहे. यात कोणीही असला, कोणत्याही राजकीय पक्षाचा असला, तरी कारवाई होईल. यदा कदाचित धनंजय मुंडे यांचे नाव आले, तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही, असे स्पष्ट वक्तव्य संजय शिरसाट यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केली आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागणे पूर्णतः अयोग्य असल्याचे भुजबळ म्हणालेत. मला मंत्री व्हायचे आहे, म्हणून कुणाचा बळी द्यावा, असे माझ्या मनातही येणे शक्य नाही, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच संतोष देशमुख हत्याकांडावरील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी या प्रकरणाची कसून चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची ग्वाही दिली आहे. त्यामुळे या घटनेचा तपास पूर्ण होण्यापूर्वीच धनंजय मुंडे यांचा राजीनामा का मागितला जात आहे? असा सवालही छगन भुजबळ यांनी केला.

## HMPV व्हायरस नवीन नाही, घाबरुन जाऊ नका : देवेंद्र फडणवीस



**कोल्हापूर :** HMPV या कोरोना सदृश विषाणूचा भारतात प्रवेश झाला आहे. देशात आतापर्यंत तीन रुग्ण आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारकडून खबरदारी घेतली जात आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली. HMPV व्हायरसमुळे घाबरू नका, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीसांनी केले आहे. तसेच या व्हायरस संदर्भातील नियमावली जाहीर होईल, असेही ते म्हणालेत.

एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग झाल्यावर, रुग्णांमध्ये सर्दी आणि कोविड-१९ सारखी लक्षणे दिसतात. या व्हायरसचा सर्वाधिक परिणाम लहान मुलांवर होत आहे. यापैकी २ वर्षांखालील मुलांना सर्वाधिक त्रास होतो.

HMPV या व्हायरसला घाबरण्याचं कारण नाही. प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाही, यापूर्वीही हा व्हायरस आला आहे. पुन्हा एकदा या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी नियमावली आहे ती जाहीर होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राज्यांना माहिती देण्याचे ठरवले आहे. या व्हायरसला घाबरुन जाण्याची आवश्यकता नाही. या संदर्भातील कपोलकल्पित माहिती देऊ नका. जी अधिकृत माहिती येईल ती माहितीच द्यावी, असे आवाहन माध्यमांना केले. आज आरोग्य विभागाची बैठक झाली आहे, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाबरोबर ऑनलाईन बैठक चालू आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत, अशी माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या एका निवेदनात देण्यात आली आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही याचे २ रुग्ण आढळून आली आहेत. या दोन्ही रुग्णांनी कुठेही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही, म्हणजेच भारतात आढळलेल्या संक्रमणांचा चीनमधील संसर्गाच्या वाढलेल्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असेही या निवेदनात सांगितले आहे.

## इंडिया गेटचे नाव बदलून भारत माता द्वार करण्याची मागणी



**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांनी इंडिया गेटचे नाव बदलून भारत माता द्वार करण्याची मागणी केली आहे. जमाल यांनी पीएम मोदींना एक पत्र लिहिले असून त्यात त्यांनी म्हटले आहे की, नाव बदलणे ही देशातील दहा हजार हुतात्म्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

जमाल म्हणाले- तुम्ही क्रूर मुघलांच्या नावाने बांधलेल्या औरंगजेब रोडचे नाव डॉ. एपीजे अब्दुल कलाम रोड असे ठेवले आहे. इंडिया गेटवरील पंचम जॉर्ज यांचा पुतळा हटवून त्याजागी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा बसवण्यात आला. राजपथाचे नामकरण कर्तव्य पथ असे करण्यात आले. तसेच इंडिया गेटचे नाव बदलून भारत माता द्वार असे करण्यात यावे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ जानेवारी २०२५


## श्रीमती राधाबाई शिंदे विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न



कन्नड(अरुण थोरात): श्रीमती राधाबाई शिंदे विद्यालय हस्ता ता.कन्नड ची शैक्षणिक सहल दि. २६ ते २८ डिसेंबर दरम्यान कळसुबाई शिखर -भंडारदरा - शिर्डी अशी यशस्वीरित्या पार पडली. या सहलीमध्ये इयत्ता ०८ ते १२ वी पर्यंत चे ८४ विद्यार्थी व ०८ शिक्षक समुहाने महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या दोन बस ने सहभागी झाले होते. या एकदिवसीय सहलीत विविध ऐतिहासिक, भौगोलिक व सांस्कृतिक वास्तूचे विद्यार्थ्यांना दर्शन झाले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण स्थळांची निवड सहलप्रमुखांनी सहलीसाठी केली होती. या सहली दरम्यान महाराष्ट्राची एव्हरेस्ट असलेले व सर्वात मोठे शिखर असलेल्या "कळसुबाई शिखर" भटकंतीचा विद्यार्थ्यांनी अनुभव घेतला. सहली दरम्यान निसर्ग जैव विविधता, भौगोलिक रचना, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब शिंदे, सहसचिव ऋतुपर्ण शिंदे, मुख्याध्यापक श्री चोंधे, सहल प्रमुख श्री बिडवे व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक यांनी परिश्रम घेतले.

## गजल



ता उम्र किया हमने, सफ़र फुलों का।
इसलीये तो है हम पे, असर फुलों का।

आकर मिलोगे तो तुम्हे भी दिखायेंगे,
पत्थर के शहर में हमारा घर फुलों का।

जख्म सहकर भी मुस्कुराते है गुलाब कैसे,
देखो, काटों के बीच है गुज़र फुलों का।

वो बेदर्द पत्थर, मेरे साथ साथ कैसे चलता,
हमारा तो दिल फुलों का, जिग़र फुलों का।

गाँव में मिट्टी की खुश्बू उसे रास नहीं आती,
मेरी दुवा है की मिले उसे भी शहर फुलों का।

तेरे बाद हम भी बन गये बेनाम मज़ार देखो,
हमे ना खौफ़ काटो का, ना डर फुलों का।

धुंड रहा है जमाना सबब हमारी मौत का,
सिर्फ हम जानते है, था वो ज़हर फुलों का।

बुज़ूर्गो की दुवाये मुक़द्दर बदल देती है,
संभाल के रख आंगन में ये शज़र फुलों का।

वक्त के गुमान में तुम इससे न उलझना फिरोज़,
रुह तक को भी चुभता है ये कहर फुलों का।

✍ फिरोज काझी

# साहित्य समाज बदलाचे प्रभावी माध्यम आहे



**कन्नड (अरुण थोरात) :** साहित्य हे समाज बदलाचे प्रभावी साधन असून कवी,लेखक, साहित्यिकांनी आपल्या लेखनीचा उपयोग समाज व राष्ट्राच्या प्रगती साठी करावा असे मत किशोर बालभारतीचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांनी व्यक्त केले आहे. ते दि.०५ जानेवारी रोजी भगवानगड मेहगाव ता. कन्नड येथे आयोजित सातव्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव प्रसंगी बोलत होते. रविवारी सातवा राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सकाळी मेहगाव ते भगवानगड अशी भव्य ग्रंथ दिंडी काढून कार्यक्रमास सुरुवात झाली. किशोर बालभारतीचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे, अध्यक्ष जेष्ठ कवी लक्ष्मण महाडिक, प्राचार्य डॉ विजय भोसले, तहसीलदार विद्याचरण कडवकर, राधाताई कडवकर, यांच्या हस्ते उदघाटन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक लक्ष्मण महाडिक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून साहित्य परंपरेचा मागोवा घेतला. आपल्या शेती मातीतील कवितांतून शेतकरी, ग्रामीण जिवनाचे वास्तव मांडले. कवींनी आपल्या लेखणीतून वास्तविक जगाचे चित्रण करुण प्रश्नांना वाचा फोडण्याचे अवाहन केले. प्रमुख अतिथी तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी आपल्या मनोगतातून बदलत्या सामाजिक परिस्थिती बाबत चींता व्यक्त करीत साहित्यिकांनी एकात्मता, शांतता, सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी आपल्या साहित्य कलाकृती चा उपयोग करण्याचे अवाहन केले. मान्यवरांचे स्वागत संमेलनाचे स्वागताध्यक्ष गणेश घुगे, भगवानगड ट्रस्टचे अध्यक्ष सुधीरजी घुगे, संयोजक डॉ शिवाजी हुसे, आदींनी केले. यानिमित्त चित्रकार महादू गावित यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते कवी सुनील डोके, अशोक गायकवाड, लक्ष्मण वाल्डे यांना राज्यस्तरीय तिफण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विविध काव्यसंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. दुपार च्या सत्रात निमंत्रित कवीसंमेलन पार पडले यात राज्यभरातून आलेल्या कवींनी आपले कविता सादरीकरण करुण उपस्थितांची मने जिंकून घेतली, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन संदीप ढाकणे, संदीप वाकडे, यांनी केले याप्रसंगी अँड कृष्णा पाटील जाधव, रंगनाथ लहाने, अंबादास सगट, प्रा.संजय गायकवाड, सुनील डोके, अशोक गायकवाड, केशरचंद राठोड, किरण निकम, गणेश शेलार, ब्रम्हगिरी गोस्वामी, दत्ता मोरसकर, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, सुभाष काळे, श्रीराम दापके, लक्ष्मण वाल्डे, का का थोरात, शुभदा देवरे, अनिता राठोड, गितांजली गजबे, का का थोरात, शिवनाथ गायकवाड आदींसह शेकडो काव्यरसिक, कवी, साहित्यिक उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ जानेवारी २०२५


## कन्नड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष निकम



**कन्नड (अरुण थोरात) :** मराठी भाषेतील आद्य पत्रकार आणि दर्पण या मराठी वृत्तपत्राचे संस्थापक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जंयती दर्पण दिन म्हणून कन्नड तालुका पत्रकार संघाच्या वतीने शहरातील कन्नड पत्रकार संघाच्या कार्यालयात दि.०६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कन्नड तालुका पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. कन्नड तालुका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्षपदी दैनिक सकाळचे कन्नड तालुका बातमीदार संतोष निकम, उपाध्यक्षपदी रेहान शेख, मधु महाले, सचिवपदी सागर पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सुरुवातीस आचार्य बाळशास्त्री जांभेकर, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन कन्नड पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सुरेश चव्हाण, माजी उपाध्यक्ष विजयकुमार मांडे, माजी सचिव कल्याण पाटील, भास्कर पाटील, संजय मुचक, डॉ. सदाशिव पाटील, अंकुश निकम, अनिल शिरसाठ, प्रमोद सोनवणे, याकुब शेख यांच्या हस्ते करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी विजयकुमार मांडे, डॉ. सदाशिव पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सागर पाटील यांनी सुत्रसंचालन केले तर मधु महाले यांनी आभार मानले.

## धनंजय मुंडे, वाल्मीक कराडमुळे पंकजा मुंडेंचा पराभव - सुरेश धस



**मुंबई :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाप्रकरणी धनंजय मुंडे अडचणीत सापडलेत. या हत्याकांडात त्यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांचा हात असल्याचा आरोप होत आहे. त्यातच आता भापजचे आष्टीचे आमदार यांनी पंकजा मुंडेंच्या लोकसभा निवडणुकीतील पराभवाबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्यामुळेच पंकजा मुंडे लोकसभा निवडणुकीत पडल्या, असा दावा सुरेश धस यांनी केला. मात्र, पंकजा मुंडे यांनी या पराभवासाठी आम्हाला जबाबदार ठरवल्याचे ते म्हणाले.

पंकजा मुंडे यांचा पराभव हा धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराडच्या दहशतीमुळे आणि त्यांच्या वागण्यामुळे झाला. वाल्मीक कराडची परळीत दहशत आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराडमुळे अनेकजण पंकजा मुंडेंवर नाराज झाल्याचा दावा सुरेश धस यांनी केला. त्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत दिसून आला. पंकजा मुंडेंना माझ्या मतदारसंघातून ३१ हजारांचे तर परळीमधून ७३ हजारांचे लीड मिळाले. मात्र, एकट्या बीड तालुक्यातून त्या ९८ हजारांनी मागे पडल्या, असे सुरेश धस यांनी टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीला मुलाखत देताना सांगितले.

वाल्मीक कराडने धनंजय मुंडेंना एकही मित्र ठेवला नसल्याचे सुरेश धस म्हणाले. एकवेळ बजरंग सोनावणे हे धनंजय मुंडे यांच्या अत्यंत जवळचे मित्र होते. वाल्मीक कराड आणि विष्णू चाटेमुळे बजरंग सोनावणे हे धनंजय मुंडेंपासून वेगळे झाल्याचे ते म्हणाले. विष्णू चाटेला तालुका अध्यक्ष करायची गरज काय होती? असा सवाल करत बजरंग सोनवणेसारखा तगडा उमेदवार समोर उभा राहिल्यानेच पंकजा यांचा पराभव झाला. ते बाजूला गेले नसते, तर पंकजा मुंडे कधीच पडल्या नसत्या, असा दावाही धस यांनी केला.

पुढे बोलतान सुरेश धस म्हणाले, पंकजा मुंडेंना हे सर्व माहिती आहे. पण त्या थेट बोलू शकत नाही. म्हणून मी हे बोलतोय. आम्ही प्रामाणिक काम केले. पण लोकसभेच्या पराभवाला आम्हाला जबाबदार ठरवण्यात आले. त्यामुळेच पंकजा मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीला आमच्याविरोधात उमेदवार दिला.

## माधवराव पाटील महाविद्यालयात व्याख्यानाने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



मुरुम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना अशोक सपाटे, चंद्रकांत बिराजदार, महेश मोटे, सुधीर पंचगल्ले, महेश निंबरगे सह पत्रकार बांधव, कर्मचारी वृंदासह उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी.

**मुरूम, (सुधीर पंचगल्ले)** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती सोमवारी ( ता.६ ) रोजी व्याख्याने उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

महाराष्ट्र पत्रकार संघ, जिल्हा उस्मानाबाद, मुरूम शहर पत्रकार संघ व श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांनी पत्रकार दिनाचे महत्त्व प्रतिपादन करताना पत्रकार हा देशाचा कणा आहे. त्यांच्या लेखणीतून समाज प्रबोधन करून देशहित, राष्ट्रप्रेम जपले पाहिजे. अन्यायाला वाचा फोडण्याचे काम पत्रकारांची लेखणी करते. असा मौलिक संदेश त्यांनी यावेळी दिला. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, महाराष्ट्र पत्रकार संघाचे डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. शिवपुत्र कनाडे, डॉ. सुशिल मठपती, महेश निंबरगे, रवी अंबुसे, अमोल गायकवाड, विशाल देशमुख, जगदीश सुरवसे, माजी तालुकाध्यक्ष बालाजी व्हनाजे, नाहीरपाशा मासूलदार, हुसेन नुरसे, डॉ. शिला स्वामी, प्रा. नारायण सोलंकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

भीमाशंकर पांचाळ, योगेश पांचाळ, नामदेव भोसले, अमोल कटके, मनोज हावळे, किशोर कारभारी, अजिंक्य राठोड आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुधीर पंचगल्ले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002